# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## नियामक मंडळाची २५ वी बैठक दि.३१.०७.२००१

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २५ वी बैठक दि.३१.०७.२००१ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २५/१

''ठराव करण्यात येतो की २४ व्या बैठकीमध्ये पारित केलेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २५/२

''ठराव करण्यात येतो की,

अ. महामंडळाची सध्याची अडचणींची आर्थिक परिस्थिती व यापुढील निधी उपलब्धतेमधील संभाव्य अडचणीं लक्षात घेता, महामंडळातील प्रकल्पांच्या कामांचा महामंडळाने सोबतच्या परिशिष्ट क्र.१ प्रमाणे पुनर्आढावा घेतल्यानुसार, यापुढे निविदांवरील दायित्व कमी करण्याच्या दृष्टीने; महामंडळाच्या काही निविदा योग्य त्या निविदा शर्तीच्या आधारे बंद करण्याचा तसेच काही निविदांच्या कामाचा कालावधी वरील पुनर्आढाव्यानुसार आवश्यक तितका वाढविण्याचा प्रस्ताव, शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच चालू प्रकल्पांतर्गत व नवीन प्रकल्पांतर्गत वेळोवेळच्या स्थानिक अडचणीं/ तात्कालिक परिस्थितीनुसार/ तांत्रिक आवश्यकतेनुसार/ कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयाच्या अनुषंगाने हाती घेणे आवश्यक असलेली कामे नवीन निविदांद्वारे हाती घेण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ब. महामंडळातील धरणांची कामे बहुतांशी पूर्णत्वाकडे पोचली आहेत तथापि कालव्यांच्या कामाचे मोठया प्रमाणातील उर्वरित स्वरुप लक्षात घेता व ही कामे शक्यतो लवकर पूर्ण झाली तरच प्रत्यक्ष सिंचन सुरु होऊन सिंचनाद्वारे पाणीपट्टी व उत्पादनाचे लाभ मिळू शकतील हे लक्षात घेता, उर्वरित कामाचे (कालव्यासह) अंदाजे रु. ४००० कोटींचा प्रस्ताव आवश्यक त्या अहवाल स्वरुपात तयार करुन, सदर प्रस्ताव जागतिक बँकेकडे अर्थसहाय्यासाठी सादर करण्याची कार्यवाही अग्रक्रमाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 25.doc

महामंडळातर्फे अर्थसहाय्याचा प्रकल्प अहवाल शासनामार्फत जागतिक बँकेला सादर झाल्यानंतर त्यास मंजुरी मिळण्यासाठी शासन/पाटबंधारे विभाग यांचेकडे पाठपुरावा त्वरेने करण्यात यावा.

क. महामंडळाच्या रोख्यांना खुल्या बाजारातून मिळणारा सध्याचा अल्प प्रतिसाद लक्षात घेता, महामंडळाकडील प्रकल्पांतर्गत जास्तीतजास्त सिंचनक्षमता निर्माण करण्यासाठी प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने, प्रकल्पांच्या उर्वरित कामांचे आवश्यक ते प्रकल्पनिहाय, घटकनिहाय इ. प्रमाणे प्रस्ताव पतपुरवठा/अर्थसहाय्य मिळण्यासाठी नाबार्ड, आय.डी.एफ.सी., जिल्हा मध्यवर्ती बँका इ. वित्त संस्थांना शासनामार्फत सादर करण्यास, तसेच वर्ष २००१-२००२ मध्ये सुमारे रु.५०० कोटी इतक्या किंमतीचे अर्थसहाय्याचे प्रस्ताव उपरोक्त संस्थांना शासनामार्फत सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ड. सद्यस्थितीतील महामंडळाचे रु. १३८६ कोटीचे दायित्व पहाता तसेच वर्ष २००१-२००२ साठी उर्वरित कालावधीसाठी लागणाऱ्या आस्थापनेचे, भूसंपादन पुनर्वसन कामाचे व इतर कामांच्या अनुदानाची आवश्यक तरतूद लक्षात घेता शासनाने मंजूर केलेल्या रु. ७८१.०७ कोटी च्या कार्यक्रमाच्या मर्यादेव्यतिरिक्त सुमारे रु. १००० कोटींच्या अतिरिक्त कार्यक्रमाची, शासन पातळीवरुन मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या महामंडळाच्या प्रस्तावास व त्यासाठी आवश्यक ते रोखे उभारणीच्या कार्यक्रमासही शासनाची मान्यता प्राप्त करुन घेण्याचा महामंडळाचा प्रस्ताव, शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

इ. उपसा योजना, कालवे, वितरण व्यवस्था इ. सिंचन सुविधा निर्माण करणारी कामे शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था त्यांच्या वर्गणीद्वारे/सदर संस्थांनी इतर पतपुरवठा संस्थांकडून उभारलेल्या निधीद्वारे करण्यास तयार असतील तर सध्या प्रायोगिक तत्वावर एक वा दोन प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थेमार्फत, योगय त्या करारनाम्याच्या आधारे, उपसा/कालव्याची/वितरण व्यवस्थेची कामे करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २५/३

''ठराव करण्यात येतो की, १.७.२००१ ते ३०.६.२००२ या कालावधीसाठी सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणीपट्टीचे दर १.७.२००० च्या तुलनेत १०% वाढविण्याची कार्यवाही मंजूर ठराव क्र.१६/७(२) च्या निर्णयाशी सुसंगत असल्याने, मान्य करण्यात येत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 25.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. २५/४

" ठराव करण्यात येतो की, १९९९-२००० या वर्षाचा महामंडळाचा वार्षिक अहवाल शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २५/५

"ठराव करण्यात येतो की, २१ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.२१/१ नुसार शासनास सादर केलेल्या लवाद निर्णयासंबंधी सर्व कार्यवाही परिपूर्णतेने होण्यासाठी मुख्य अभियंता चे पद पुनरुज्जिवित करणे व कार्यकारी गट कार्यान्वित करण्याच्या प्रस्तावास शासनाने लवकरात लवकर मान्यता द्यावी व मुख्य अभियंता चे पद त्वरित पुनरुज्जिवित करावे यासाठी शासनास पाठपुरावा करण्याबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २५/६

"ठराव करण्यात येतो की, १.७.२००१ ते ३०.६.२००२ या कालावधीसाठी शासकीय जलाशय व नदीतून खाजगी उपसासाठी घनमापन पद्धतीचा पाणीपट्टीचा दर ६० रुपये प्रति सहस्त्र घनमीटर आकारण्यास खालील परतुंकाच्या अधीन राहून नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.

१. घनमापन पद्धतीने मोजून दिलेल्या पाण्यावर आकारणी करण्याची असल्याने पीक कोणते हे पहाण्याची आवश्यकता नाही.

२. लाभधारकांनी पाणी वापर सहकारी संस्था स्थापन केल्यास त्या संस्थांनी घनमापन पद्धतीवर आकारलेली पाणीपट्टीची देयके निर्धारित दिनांकापर्यंत भरल्यास, देयकाच्या मूळ रकमेवर ५% सूट देण्यात येईल."

ठराव क्र. २५/७

"ठराव करण्यात येतो की, शासनाच्या जा.क्र. मकृखोविम/१०००/१८८३/(३०७/२०००)/जसंनि दि.५.७.२००१ च्या पत्रास अनुसरुन कर्जरोखे मालिका २०००/ब मधील रोख्यांद्वारे प्राप्त होणाऱ्या निधी वितरणाबाबत दि.५.७.२००१ नंतर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या मंजुरीनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या मालिकेतील तिसऱ्या टप्प्यांमध्ये दि.१३.७.२००१ पर्यंत मा. अध्यक्षांच्या मंजुरीने परिशिष्ट क्र.३ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार राबविलेल्या

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

कार्यपद्धतीस नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे व यानुसार शासनास कळविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. २५/८

''ठराव करण्यात येतो की,

१. २००१-२००२ या आर्थिक वर्षात रु. ८७० कोटी टप्प्या टप्प्याने सार्वजनिक रोखेविक्री, खाजगी रोखेविक्री, बँकांमार्फत कर्जे यापैकी सोयीस्कर पद्धतीद्वारे निधी उभारण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे.

२. २००१-२००२ या आर्थिक वर्षात रोखेविक्री प्रक्रियेसाठी लिड अरेंजर्स, विश्वस्त संस्था, निबंधक, रेटींग एजन्सी, कर सल्लागार, लेखा परिक्षक, बँकर्स, मुद्रक, जनसंपर्क संस्था व इतर आवश्यक संस्थांच्या नेमणूका मा. अध्यक्षांच्या संमतीने करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

३. २००१-२००२ या आर्थिक वर्षात रु.८७० कोटीचा निधी उभारण्याच्या प्रक्रियेसाठी लिड अरेंजर्स, विश्वस्त संस्था, रेटींग एजन्सी, निबंधक(रजिस्ट्रार्स), फार्मस, माहिती पुस्तके, जाहिराती, जनसंपर्क मोहिम, प्रदर्शने (त्याच्या आवश्यक साहित्यासह) जनसंपर्क सभा/परिसंवाद बैठका, शुभारंभ, वाहन व्यवस्था व दळणवळण/संपर्क सुविधा (जसे फॅक्स, दूरध्वनी, ई-मेल इ.) प्रोत्साहन रक्कम, शासनाची हमी फी इ. वरील आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी रु.१८५.५० कोटी मंजूर करण्यात येत असून हा खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

४. खाजगी/सार्वजनिक रोखेविक्री, बँकांकडून कर्ज घेणे इत्यादी निधी उभारण्याच्या संबंधातील सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर, दस्तऐवजांवर महामंडळातर्फे सह्या करणे, संबंधितांना सह्यांचे प्राधिकार महामंडळातर्फे प्रदान करणे, जमा रकमा खाते उघडणे, रोखेविक्री चालू करणे, आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणे व बंद करणे, रोखे वितरण करणे, रोखे हस्तांतरण करणे व इतर सर्व आवश्यक त्या कृती/कार्यवाही करणे हे सर्व अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

५. वरील (१) मधील रोखे वितरण करण्यासाठी आवश्यक तो त्रिपक्षीय करार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन व विश्वस्त संस्था

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

किंवा बँका यांच्यामधील यापूर्वी केलेल्या त्रिपक्षीय करारानुसारच असावा व त्यावर स्वाक्षरी करण्याचे प्राधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत. तसेच करारातील मसुद्यामध्ये शासन निर्देश देईल त्याप्रमाणे वाढ किंवा बदल करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

६. कृष्णा खोऱ्यातील कामांचा सचित्र नियतकालिक प्रगती अहवाल सर्व गुंतवणूकदारांना पाठविण्यात यावा, जेणेकरुन गुंतवणूकदारांना महामंडळाच्या कामांच्या प्रगतीबाबत अद्ययावत माहिती प्राप्त होईल. त्यानुषंगाने भविष्यकाळातील कर्जरोखे मालिकांना गुंतवणूकदारांचा उत्तम पाठिंबा मिळू शकेल.''

ठराव क्रमांक २५/९

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाने उभारलेल्या निधीवरील शासनास द्यावयाचे हमी शुल्क त्यावरील दंडनीय व्याजासह शासनाने माफ करणे श्रेयस्कर राहील. यानुषंगाने हमी शुल्क रक्कम रु.३९०.४८ कोटी माफ करण्याबाबत नियामक मंडळाची शिफारस असून तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत नियामक मंडळाची मंजूरी देण्यात येत आहे.''

ठराव क्रमांक २५/१०

''ठराव करण्यांत येतो की, शासन हमीवर युनायटेड वेस्टर्न बँक, कॅम्प शाखा, पुणे व कॅनरा बँक, कॅम्प शाखा, पुणे यांचेकडून घेतलेल्या व उर्वरीत अनुक्रमे प्रत्येकी रु. ६० कोटी व रु. २४ कोटी कर्जाचे परतफेडीस दिनांक २७.१२.२००२ अखेर मुदतवाढ देण्यास त्यानुषंगाने प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.''

ठराव क्रमांक २५/११

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या मंजूर आर्थिक कार्यक्रमांतर्गत इतर पाटबंधारे विकास महामंडळे, राज्य शासनाचे इतर अंगीकृत उपक्रम, बँका, वित्तिय संस्था यांचेकडून अल्पमुदत कर्ज/अल्पमुदत ठेवीव्दारे निधी उभारणी करणे, बँकांकडून महामंडळाच्या ठेवीवर अधिकर्ष घेणे याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना देण्याबाबत नियामक मंडळ मान्यता देत आहे.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. २५/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळातील धरणांद्वारा विविध नगर परिषदा, नगरपालिका, औद्योगिक वसाहती इत्यादींना उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने त्यांच्याकडील मोठया प्रमाणावर, बराच काळपर्यंत थकित असलेली पाणीपट्टी विचारात घेता, ही वसूली करण्याच्या दृष्टीने संबधित संस्थांना नोटीस देऊन तसेच आवश्यक असल्यास त्याचा पाणीपुरवठा खंडीत करुन, ही थकीत पाणीपट्टी वसुली प्राप्त करुन घेण्याची आवश्यक ती कार्यवाही कार्यकारी संचालक यांनी करावी."

ठराव क्र.२५/१३

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाने महसूल विभागास महामंडळ स्थापनेनंतर वेळोवळी दिलेल्या भूसंपादन/ पुनर्वसनासाठीच्या अनुदानाचा प्रकल्पनिहाय/ जिल्हानिहाय हिशोब महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून तातडीने प्राप्त करुन घ्यावा. या कार्यवाहीस गती देण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांबरोबर तातडीने बैठक आयोजित करावी व हिशोब त्वरेने प्राप्त करुन घ्यावेत."

ठराव क्र.२५/१४

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील आस्थापना मूलतः शासनाकडील असल्याने या आस्थापनेचा खर्च, हा शासनाच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करुन शासनामार्फत प्राप्त व्हावा असा प्रस्ताव करण्यास, तसेच शासनाकडून महामंडळाच्या अधिनियम क्र.१५/४.४.९६ मधील तरतुदींनुसार, महामंडळास अनुज्ञेय असलेले रु.३५०० कोटींपैकी रु. २१३७ कोटी इतके उर्वरित भांडवली अंशदान महामंडळास उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.२५/१५

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाने तयार केलेल्या पर्यटनाच्या बृहत आराखड्याच्या आधारे, महामंडळाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या संमतीने, कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदर

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

पर्यटनाचा आराखडा राबविण्याच्या दृष्टीने विदर्भ, पाटबंधारे महामंडळ,नागपूर यांनी अनुसरलेली कार्यपद्धती योग्य त्या बदलांसह अवलंबण्यात यावी.''

ठराव क्र.२५/१६

''ठराव करण्यात येतो की, शासनाच्या निर्णयानुसार महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील जलाशयामध्ये मत्स्य उत्पादनाचे ठेके, शासनाच्या कृषि विभागांतर्गत मत्स्य व्यवसाय विभागामार्फत देण्याच्या शासनाच्या निर्णयाचा फेरविचार करुन महामंडळाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अधिनियम क्र.१५/४.४.९६ मधील १९(ड) नुसार, जुन्या तसेच नवीन बांधण्यात आलेल्या/यावयाच्या सर्व जलाशयांवरील मत्स्य संवर्धन व उत्पादनाचे लिलाव महामंडळाने करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पुनर्विचारार्थ सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारे प्राप्त प्रस्तावावरील शासन स्तरावरील पुढील कार्यवाही सचिव (पा) व सदस्य यांनी तातडीने करावी.''

x

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक |
| म.कृ.खो.वि.म., पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

Resolution dir meet 25.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

## महामंडळातील प्रकल्पांच्या उर्वरित निविदा किंमतीचा प्रकल्पांच्या गटानुसार गोषवारा

परिशिष्ट क्र. १

(रु. कोटीमध्ये)

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | १.४.२००१ ची उर्वरित किंमत | | | धरण कामांची उर्वरित किंमत | | | | कालवे कामांची उर्वरित किंमत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | धरण | कालवे | एकूण | निविदा निश्चित करण्यात आलेल्या कामांची उर्वरित किंमत | | निविदा निश्चित न करण्यात आलेल्या कामांची किमत | एकूण (६+७) | निविदा निश्चित करण्यात आलेल्या कामांची उर्वरित किंमत | | निविदा निश्चित न करण्यात आलेल्या कामांची किमत - अस्तरीकरण कामांची किंमत | निविदा निश्चित न करण्यात आलेल्या कामांची किमत - अस्तरीकरण विरहित कामांची किंमत | एकूण (९+१०+११) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ | ८ | ९ | | १० | ११ | १२ |
| | प्रपत्र अ-१ | | | | | | | | | | | | |
| | मोठे प्रकल्प | १५४.०० | १९५४.०० | २१०८.०० | ११६.५३ | ( २२.३३ ) | ३७.४७ | १५४.०० | ३०८.०३ | ( ८६.१९ ) | ३७४.३१ | १२७१.६६ | १९५४.०० |
| | मध्यम प्रकल्प | ५.९० | १७.१० | २३.०० | ३.९० | ( ०.७७ ) | २.०० | ५.९० | २.९७ | ( ०.८४ ) | १.९६ | १२.१७ | १७.१० |
| | लघु प्रकल्प | ९.१० | १३.३० | २२.४० | ८.६० | ( १.९१ ) | ०.५० | ९.१० | ६.९० | ( १.९८ ) | ०.०० | ६.४० | १३.३० |
| | एकूण (अ-१) : | १६९.०० | १९८४.४० | २१५३.४० | १२९.०३ | ( २५.०१ ) | ३९.९७ | १६९.०० | ३१७.९० | ( ८९.०१ ) | ३७६.२७ | १२९०.२३ | १९८४.४० |
| | प्रपत्र ब-१ | | | | | | | | | | | | |
| | मोठे प्रकल्प | ३६७.०० | १०२३.०० | १३९०.०० | २७६.०० | ( २७६.०० ) | ९१.०० | ३६७.०० | २१८.०० | ( ४४.६० ) | २२४.६० | ५८०.४० | १०२३.०० |
| | मध्यम प्रकल्प | १९३.०० | ४९.०० | २४२.०० | १४६.०० | ( १४६.०० ) | ४८.०० | १९४.०० | ०.६० | ( ०.०० ) | ०.४० | ४८.६० | ४९.६० |
| | लघु प्रकल्प | ६२.०० | ८.०० | ७०.०० | ५८.०० | ( ५८.०० ) | ४.०० | ६२.०० | २.०० | ( ०.४० ) | ०.०० | ६.०० | ८.०० |
| | एकूण (ब-१): | ६२२.०० | १०८०.०० | १७०२.०० | ४८०.०० | ( ४८०.०० ) | १४३.०० | ६२३.०० | २२०.६० | ( ४५.०० ) | २२५.०० | ६३५.०० | १०८०.६० |
| | प्रपत्र क-१ | | | | | | | | | | | | |
| | उपसा सिंचन योजना | १५६९.०० | ९९७.०० | २५६६.०० | १२३२.०० | ( १२५.०० ) | ३३७.०० | १५६९.०० | १७५.९३ | ( २०.०० ) | १२५.३० | ६९५.७७ | ९९७.०० |
| | प्रपत्र ड-१ | | | | | | | | | | | | |
| | मोठे प्रकल्प | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ०.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | मध्यम प्रकल्प | २८४.०० | ३.०० | २८७.०० | २६९.१५ | ( २६९.१५ ) | १४.८५ | २८४.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ३.०० | ३.०० |
| | लघु प्रकल्प | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ०.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (ड-१): | २८४.०० | ३.०० | २८७.०० | २६९.१५ | ( २६९.१५ ) | १४.८५ | २८४.०० | ०.०० | ( ०.०० ) | ०.०० | ३.०० | ३.०० |
| | एकूण अ, ब, क, ड : | २६४४.०० | ४०६४.४० | ६७०८.४० | २११०.१८ | ( ८९९.१६ ) | ५३४.८२ | २६४५.०० | ७१४.४३ | ( १५४.०१ ) | ७२६.५७ | २६२४.०० | ४०६५.०० |

cab_meet_28_7_2001_mkvdc.xls

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

abs_fielddata

# वित्तीय वर्ष २००१-२००२ मध्ये कर्जरोखे मालिकेव्दारे रु.८७० कोटी निधी उभारण्यासाठी लागणारा खर्च (आवर्ती खर्चासह)

(रु.लाख)

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | | अनावर्ती खर्च | |
| | १ | लिड अरेंजर्स | १७४.०० |
| | २ | विश्वस्त संस्था | ०.२९ |
| | ३ | रजिस्ट्रार्स | २.८६ |
| | ४ | बँकर्स फि | ०.२६ |
| | ५ | माहिती पुस्तके, लेटर्स ऑफ ॲलॉटमेंट, बॉण्ड सर्टिफिकेटस | ०.९८ |
| | ६ | शुभारंभ, जनसंपर्क बैठका इ. | ५.०० |
| | | एकूण (अ) | १८३.३९ |
| ब. | | आवर्ती खर्च | --- |
| | १ | रेटींग सर्व्हेलन्स फि | ८२.१० |
| | २ | रजिस्ट्रार्स फि | ४.८७ |
| | ३ | लिस्टींग फि | २६.७८ |
| | ४ | विश्वस्त संस्थांची फिस | १३३.२० |
| | ५ | शासन हमीशुल्क | १८१२०.०० |
| | | एकूण (ब) | १८३६६.९५ |

(एकूण अ +ब) - रु.१८५५०.३४ लाख

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 25.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ९९.

परिशिष्ट क्र. ३

## २००० बी मालिकेतील तिसऱ्या टप्प्यातील निधी वितरणाबाबत मार्गदर्शक तत्वे

| अ.क्र. | मार्गदर्शक तत्वे |
|---|---|
| अ. | रु.१० कोटीपेक्षा अधिक निविदा असलेल्या किंवा कंत्राटदार असोसिएशन व्यतिरिक्त इतर कंत्राटदारांच्या स्वेच्छा प्रयत्नाने जमा झालेल्या निधीतून १/३ निधी असोसिएशनला उपलब्ध करुन द्यावा व हा सर्व निधी असोसिएशनमधील कंत्राटदारांना वितरीत करावा. |
| ब. | उर्वरीत २/३ निधीतून ७० टक्के निधी कंत्राटदारांच्या देयकांसाठी वापरावा व ३०% निधी महामंडळाच्या विहित केलेल्या मान्य बाबींवर उदा. कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, कार्यालयीन खर्च, भूसंपादनावरील खर्च यांवर करण्यात यावा. |
| क. | कंत्राटदार असोसिएशनच्या प्रयत्नाने थेट जमा झालेल्या गुंतवणूक निधीचा १००% वापर कंत्राटदार असोसिएशनमार्फत येणाऱ्या कंत्राटदारांच्या कामांची देयके प्रदान करण्यासाठी करावा. |

x

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

Resolution dir meet 25.doc